# शाश्वत विकासासाठी पर्यावरण शिक्षणाची गरज
# [Need of Environment Education for Sustainable Development]

**Shivaji Dattatraya Thore**
Ph.D., M.Phil., M.Com., M.A.(Eco),M.A.(Pol), M.A.(Mar).,G.D.C. & A., B.Ed.(Gen),B.Ed.(Phy),
Arts, Science &Commerce Collage, Manmad Dist-Nashik (M.S)
Head-Dept. of Commerce, Guide-Savitribai Phule Pune University [Business Administration& Business Practices]

## १) प्रास्ताविक : Introduction

भारत या देशाची जागतिक पातळीवर विकसनशील राष्ट्राकडून विकसित राष्ट्राकडे वाटचाल करणारा देश म्हणून ओळख होत आहे, अलिकडे प्रत्येक क्षेत्रात प्रगती दिसत आहे, स्पर्धेच्या युगात होणाऱ्या वाढ, विकास व वृद्धी या प्रगतीबरोबरच विविध आव्हाने भारतीय समाजापुढे उभी आहेत.

अलिकडे पर्यावरणाचा मोठ्या प्रमाणात ऱ्हास देशात होत आहे, यामुळे भारतापुढे नव्हे तर संपूर्ण जगासमोर एक मोठे आव्हान आहे, यामुळे आज प्राधान्याने पर्यावरण संरक्षण याकडे विशेष लक्ष दिले जात आहे.

१९८६ च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाने 'पर्यावरण संरक्षणा'चा दहा पायाभूत घटकांत समावेश केला आहे. अलिकडे प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तरावरती विविध इयत्तांमध्ये पर्यावरण शिक्षणाचा समावेश होत आहे.

१९७२ मध्ये राज्य घटनेत दुरूस्ती करून [कलम ५१] द्वारे मूलभूत कर्तव्यांमध्ये पर्यावरण संरक्षणाचा समावेश केला आहे. यासारख्या विविध तरतुदी करूनसुद्धा पर्यावरणाचा ऱ्हास थांबत नाही. यावर शासन मोठ्या प्रमाणात उपाययोजना करीत आहे.

## २) उद्देश : [Objective]

अ) पर्यावरण शिक्षणाचा अभ्यास करणे
आ) पर्यावरण शिक्षणाची उद्दिष्ट्येचा अभ्यास करणे
इ) पर्यावरण संरक्षणाबाबत घडामोडींचा अभ्यास करणे
ई) विकासासाठी पर्यावरण शिक्षणाच्या गरजेचा अभ्यास करणे

## ३) गृहितके :

अ) पर्यावरण शिक्षणाचा अभ्यास करीत आहे
आ) पर्यावरण शिक्षणाची उद्दिष्ट्यांचा अभ्यास होत आहे
इ) पर्यावरण संरक्षणाबाबत घडामोडींचा अभ्यास होत आहे

ई) विकासासाठी पर्यावरण शिक्षणाची गरज पाहून संशोधन होत आहे.

## ४) पर्यावरण शिक्षण : [Environment Education]

पर्यावरण यासाठी इंग्रजीमध्ये Environment हा शब्द आहे. Environ याचा अर्थ to surround असा होतो. To surround याचा अर्थ वेढणे / एखाद्या परीस्थितीला वेढणे असा होतो.

‘The entire range external influences acting to an organism both the physical and biological constitute Environment.’

- Britinnica Encyclopedia

‘एखाद्या सजीवावर भौतिक आणि जैविक घटक परिणाम करतात, त्याचा समावेश पर्यावरणात होतो.’

‘The sum total of all conditions and influences which affect the development growth, life and death of an organism, specis or race.’

- Universal Encyclopedia

‘एखादा सजीव, त्याची जात / वंश यांची वाढ, विकास, जीवन आणि मृत्यु या सर्वांवर परिणाम करणाऱ्या सर्व परिस्थिती, संख्या व प्रभावी घटक यांच्या समुच्चयाला पर्यावरण म्हणतात.’

पर्यावरण ही सापेक्ष संज्ञा आहे.




## ५) युनेस्कोने सांगितलेली पर्यावरण शिक्षणाची उद्दिष्ट्ये :

क) नागरिकांमध्ये पर्यावरणाविषयी जाणीव-जागृती निर्माण करणे

ख) नागरिकांना पर्यावरणाविषयी ज्ञान देणे व अनुभव प्राप्त करून देण्याची संधी देणे.

ग) नागरिकांमध्ये पर्यावरणाविषयी सकारात्मक अभिवृत्तीचा विकास करणे

घ) नागरिकांमध्ये पर्यावरणाविषयक सकारात्मक मूल्ये निर्माण करणे

ङ) पर्यावरणाविषयक समस्या सोडविण्यासाठी नागरिकांमध्ये आवश्यक कौशल्यांचा विकास करणे

च) नागरिकांमध्ये पर्यावरणाचे आर्थिक महत्व, सौंदर्यमूल्य इ. चे आकलन करण्याची क्षमता निर्माण करणे

छ) पर्यावरण संवर्धनामध्ये आणि पर्यावरणविषयक चळवळींमध्ये नागरिकांचा सक्रीय सहभाग प्राप्त करणे

अमेरिकेतील स्मिथसोनिअन संस्थेने भारतीय शिक्षण प्रणालीत सर्व स्तरांवर पर्यावरण शिक्षण आरंभ करण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाच्या माध्यमातून एका कार्यशाळेचे आयोजन केले होते. या कार्यशाळेत पर्यावरण शिक्षणाची विविध स्तरांवरील उद्दिष्टे तथा अभ्यासक्रम निश्चित करण्यात आला.

## ६) पर्यावरण संरक्षण व शिक्षणाबाबतच्या महत्वाच्या घडामोडी :

१९५८ - लंडन येथे धुके [smog] ची घटना जागतिक स्तरावर पर्यावरणाचा विचार करण्यास करणीभूत ठरेल.

१९७१ - विद्यापीठ अनुदान आयोगाने [UGC] 'पर्यावरण' या विषयावर एक कार्यशाळा आयोजित केली.

१९७२ - स्टॉकहोम परिषद स्वीडनमध्ये भरली. आंतरराष्ट्रीय पातळीवरील ही पहिली परिषद होती. भारताच्या वतीने इंदिरा गांधी यांनी भाषण केले. गरिबीने प्रदूषण निर्माण होते हा विचार मांडला. २० वर्षांनंतर एकत्र येण्याचे ठरले. या परिषदेत 'संयुक्त राष्ट्रसंघ पर्यावरण कार्यक्रम' [United Nation's Environmental Programme] UNEP या विभागाची स्थापना केली.

१९७२ - मध्ये भारतीय राज्यघटनेत दुरूस्ती करून (कलम ५१) मूलभूत कर्तव्यात पर्यावरण संरक्षणाची तरतूद करण्यात आली.

१९७४ - पर्यावरण शिक्षणाचे स्वरूप शालेय शिक्षणाशी जोडण्यात आले.

१९७५ - आंतरराष्ट्रीय पर्यावरण शिक्षण कार्यक्रमातर्फे 'बेलग्रेड' येथे एक कृतिसत्र आयोजित केले.

१९७७ - 'तिबलीसी' [Tiblissi] (रशिया) येथे परिषद भरली होती.

१९८० - भारतात स्वतंत्र केंद्रीय पर्यावरण व वन मंत्रालयाची स्थापना – भोपाळ येथे राष्ट्रीय पर्यावरण संस्थेची स्थापना.

१९८३-८५ - 'World Commission on Environmental & Development' या कमिशनचे Brudtland हे अध्यक्ष होते. त्यामुळे यास Brudtland Commission या नावानेही ओळखले जाते. ब्रुडलॅण्ड यांनी शाश्वत विकासाची व्याख्या येथेच केली.

१९८३ - Non Aligned Summit मध्ये भारतातर्फे पर्यावरण जतन व आर्थिक विकासाच्या संबंधाला मान्यता देण्यात आली.

१९८५ - NCERT ने प्राथमिक स्तरावरील पर्यावरण शिक्षणाचा अभ्यासक्रम तयार केला.

१९९२ - ब्राझीलमध्ये (रिओ) येथे १९७२ ला ठरल्याप्रमाणे २० वर्षांनी परिषद भरली. वसुंधरा शिखर परिषद या नावाने ती ओळखली जाते.

२००२ - १९९२ नंतर १० वर्षांनी पुन्हा एकदा जागतिक स्तरावर सर्वजण एकत्र आले. ही परिषद जोहान्स बर्ग (दक्षिण आफ्रिका) येथे भरली होती.

२००५ - आग्रा (भारत) येथे आंतरराष्ट्रीय पातळीवरील परिषद भरली. या परिषदेत पर्यावरण शिक्षणाची ध्येये, उद्दिष्टे याबाबत चर्चा झाली.

२००५ - भारतात राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा – २००५ मध्ये 'पर्यावरण शिक्षण – चिरंतन विकासासाठीचे शिक्षण' म्हणून समावेश करण्यात आला.

२००५-१४ - युनोने २००५ ते २०१५ हे दशक चिरंतन विकासासाठीचे दशक म्हणून जाहीर केले.

## ७) शाश्वत विकासासाठी पर्यावरण शिक्षणाची गरज : [Need of Environment Education for Sustainable Development]

चालू दशक [२००५-२०१५] हे 'शाश्वत विकासासाठीच्या शिक्षणाचे दशक' म्हणून युनोने जाहीर केले आहे. आज जग विज्ञान, तंत्रज्ञानाच्या जोरावरती मोठ्या प्रमाणात प्रत्येक क्षेत्रात प्रगती साधत आहे. याच वेळी पर्यावरणाकडे दुर्लक्ष केल्याने

ही प्रगती चिरंतन किंवा शाश्वत असेलच असे सांगता येत नाही, यामुळेच शाश्वत विकासासाठी पर्यावरण शिक्षणाची गरज भासते.

**गरज**

क) वर्तमान व भावी पिढीच्या गरजा भागविण्याची क्षमता निर्माण करण्यासाठी
ख) चिरंतन / शाश्वत मानवी विकास साधण्यासाठी
ग) पर्यावरण व शिक्षण यांचा एकत्रित विचार करण्यासाठी
घ) निसर्गाचा विवेकपूर्ण वापर करण्याची वृत्ती निर्माण करण्यासाठी
ङ) पर्यावरणाचा समतोल राखला जावा यासाठी
च) नैसर्गिक साधन संपत्तीचा काळजीपूर्वक, योग्य वापर करण्यासाठी
छ) पर्यावरणीय समस्या टाळण्यासाठी
ज) पर्यावरणाचा होत असलेला ऱ्हास थांबविण्यासाठी
झ) आरोग्यदायी जीवन जगण्यास मदत करण्यासाठी
ञ) राहणीमानाचा दर्जा सुधारण्यासाठी

## ८) शाश्वत विकासासाठी पर्यावरण शिक्षणाचे महत्व : [Importance of Environment Education for Sustainable Development]



## ९) **समारोप :**

स्पर्धेच्या युगात विद्यार्थी वर्ग यशस्वी होऊन देशांत शांतता नांदून रोजगार वाढ, राष्ट्रीय उत्पादनात वाढ, भेदभाव कमी, समानता या सर्व महत्वाच्या बाबी घडून येण्यासाठी विद्यार्थ्यांना प्राथमिक ते उच्च स्तरावरील शिक्षण निसर्गाच्या माध्यमातून देण्यासाठी शासन स्तरावरून प्रयत्न करणे महत्वाचे आहे. ते होत आहे. विद्यार्थ्यांना निसर्गाच्या इतिहासाचे ज्ञान देणे. पर्यावरण संतुलनाबाबत माहिती देणे, निसर्गाबाबत उत्सुकता जागृत करणे, वैयक्तिक आरोग्याचे महत्व स्पष्ट करणे, पर्यावरणाचे मानवी जीवनातील महत्व स्पष्ट करणे, परिसंस्थेबद्दल ज्ञान देणे, पर्यावरणाबद्दल सकारात्मक दृष्टीकोन विकसित करणे, प्रदूषणाबद्दल सामान्य माहिती देणे, पर्यावरणाबद्दल सकारात्मक मूल्ये रूजविणे.

वरील सर्व उद्दिष्टांनुसार शासन देशात नव्हे तर जगात मोठ्या प्रमाणात प्रयत्न करीत आहे. यातून भक्कम नेता ही देशाला मिळेल, यात शंकाच नाही.

**१०) संदर्भसुची : [Bibliography]**


अ) अध्ययन व अध्यापन प्रा. गणेश चव्हाण (नित्य/नूतन प्रकाशन, पुणे)

आ) आधुनिक शिक्षण प्रा. कुलकर्णी प्रगती प्रकाशन, पुणे

इ) अध्ययन अध्यापनाचे मानसशास्त्र प्रगती प्रकाशन, पुणे

ई) शैक्षणिक मूल्यमापन प्रगती प्रकाशन, पुणे

उ) मराठी प्रथम व प्रादेशिक भाषा अध्यापक शिक्षक प्रगती, पुणे

ऊ) मानसशास्त्राचा विकास आणि अध्ययन प्रगती प्रकाशन, पुणे

ऋ) नागतोडे किरण नैतिक मूल्य शिक्षण

ऌ) ठोंबरे विद्या – नितीमूल्य व शिक्षण नूतन प्रकाशन, पुणे

ऍ) सहस्त्रबुदे विह शिक्षणातून नैतिक मूल्य संवर्धन साधना प्रकाशन, पुणे